## BOMBAY ACT No. XVI OF 1959.

### AN ACT TO PROVIDE FOR UNIFORMITY IN THE APPLICATION OF THE INDUSTRIAL DISPUTES ACT, 1947, IN THE STATE OF BOMBAY.

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १६.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर 'मुंबई राजपत्रांत' तारीख २६ मार्च १९५९ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

### औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मुंबई राज्यांत लागू करतांना त्यांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थीं, मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशास लागू असलेला औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ हा औद्योगिक विवाद (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५३, आणि औद्योगिक विवाद व औद्योगिक विवाद (अपील न्यायाधिकरण) (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५५ यांवरून सुधारण्यांत आला आहे;

आणि ज्याअर्थीं, मुंबई राज्याच्या इतर प्रदेशांस लागू असलेला औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ हा सुधारण्यांत आलेला नाहीं;

आणि ज्याअर्थीं, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ हा सबंध मुंबई राज्यास लागू करतांना त्यांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करणें व, त्या कारणाकरितां औद्योगिक विवाद (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५३, आणि औद्योगिक विवाद व औद्योगिक विवाद (अपील न्यायाधिकरण) (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५५ यांवरून केलेल्या सुधारणा रद्द करणें इष्ट आहे; त्याअर्थीं, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षीं यावरून पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे:—

**लघु संज्ञा.** १. या अधिनियमास औद्योगिक विवाद (मुंबईकरितां एकसूत्रता आणण्याची तरतूद करण्याबाबत) अधिनियम, १९५९ असें म्हणावें.

**सबंध राज्यांत औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ यांत एकसूत्रता आणणें.** २. औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ (ज्याचा यांत पुढें "मुख्य अधिनियम" असा उल्लेख केला आहे) हा, सबंध राज्यास लागू करतांना त्याच्या उपबंधांत एकसूत्रता आणण्यासाठीं तरतूद करण्याच्या कारणाकरितां, औद्योगिक विवाद (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५३, आणि औद्योगिक विवाद व औद्योगिक विवाद (अपील न्यायाधिकरण) (सौराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९५५, (ज्यांचा यांत पुढें "सुधारणा करणारे उक्त अधिनियम" असा उल्लेख केला आहे) यांवरून मुख्य अधिनियमांत केलेल्या आणि मुंबई राज्याच्या सौराष्ट्र प्रदेशांत ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळीं अंमलांत असलेल्या सर्व सुधारणा अंमलांत असण्याचें बंद होईल आणि त्या रद्द होतील; आणि जणूं कांहीं सुधारणा करणारे उक्त अधिनियम संमत झाले नसल्याप्रमाणें मुख्य अधिनियम उक्त प्रदेशांत अंमलांत येईल.

**बचाव.** ३. कलम २ मधील कोणत्याहि मजकुरामुळें,—

(अ) हा अधिनियम अंमलांत येण्याच्या तारखेपूर्वी संपादन केलेल्या किंवा प्राप्त झालेल्या कोणत्याहि हक्कास, विशेष हक्कास किंवा पत्करलेल्या बंधनास किंवा जबाबदारीस; किंवा

(ब) अशा तारखेपूर्वी कोणत्याहि अधिनियमाच्या संबंधांत पत्करलेल्या किंवा लादलेल्या कोणत्याहि दंडास, जप्तीस किंवा शिक्षेस ; किंवा

(क) वर सांगितलेला असा कोणताहि हक्क, विशेष हक्क, बंधन, जबाबदारी, दंड, जप्ति किंवा शिक्षा यांच्या संबंधांतील कोणत्याहि चौकशीस, वैध कारवाईस किंवा उपाययोजनेस,

बाध येणार नाहीं आणि जणूं हा अधिनियम संमत झाला नसल्याप्रमाणें अशी कोणतीहि चौकशी, वैध कारवाई किंवा उपाययोजना दाखल करण्याचा, चालू ठेवण्याचा किंवा अंमलांत आणण्याचा आणि असा कोणताहि दंड, जप्ति किंवा शिक्षा लादण्याचा अधिकार आहे.

(True translation)

Y. H. PITKE,
Examiner of Books and Publications, Bombay.